I J R S S I S, Issue (VIII), Vol. II, Jan 2023: 321-330
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 517X
Original Article

Reg. No.: MH-NGP/000016?
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# गडचिरोली जिल्हयातील आदिवासी महिलांच्या स्वास्थ्यसंवर्धनात्मक दृष्टीकोनातून वनौषधी आणि स्वंयरोजगार (धानोरा तालुक्याशी संबधीत)

. मिनाक्षी दादाजी नागदेवते[१] व माधूरी ना. कोकोडे[२]
[१]सरदार पटेल महाविद्यालय चंद्रपूर
[२]गृह अर्थषास्त्र श्री. गोविंदप्रभू कला वाणिज्य महाविद्यालय, तळोधी (बा) जि. चंद्रपुर
*Corresponding Author: dryadavcmendhe@gmail.com, mn.kokode@gmail.com

Communicated : 02.01.2023 | Revision : 08.01.2023 Accepted : 15.01.2023 | Published: 27.01.2023

**सारांश :-**

आदिकाळापासून सर्वात मागासलेला समाज म्हणजे आदिवासी होय.पूर्विपासून जंगलात राहून जीवन जगणारा तसेच जंगलाच्या कुशीत आपली उपजिविका शोधणारा समाज आहे. यांचे सर्व जीवन जंगल व वनौषधीवर अंवलबून असते. मनूष्य हा संशोधन प्रिय असल्यामुळे निसर्गात आढळणारे पाने. फुले, मुळ, वेली, वृक्ष याच्यापासून अनेक प्रंकारच्या औषधी निर्माण केल्या आहेत. गडचिरोली जिल्हा हा ७४टक्के जंगलाने व्यापलेला असल्यामुळे. या जंगलात औषधी गुण असलेल्या हजारो वनस्पती आहेत. या वनस्पतीचा विविध आजारावर उपयोग केला जातो. परंतू आजचि परिस्थिती बदलली आहे. वनकायदे आल्यामूळे येथिल लोकाना वनौषधीचा उपयोग करण्यासाठी अडचणी येतात. नविन पिढीला आधुनिक गोष्टीचे जास्त आकर्षण असल्यामूळे नविन गोष्टी लवकर स्विकारतात. त्याच्याजवळ असलेल्या वनौषधी कडे दुर्लक्ष करतात. नविन पिढीला वनौषधीबद्दल माहिती देऊन त्यांचे महत्व या पीढीला पटवून देणे आवश्यक आहे. कोणत्या वनस्पतीचा कोणत्या आजारावर औषध म्हणून उपयोग होतो हे माहीत नसते. विविध पेय, काढा, चूर्ण, हे त्याना माहित नसते, अश्या प्रश्नाची उत्तरे शोधण्यासाठी या विषयाची गरज आहे.येथिल महिलाना वनौषधीबद्दल माहिती देऊन स्वास्थ्यसाठी किती उपयोगी आहे व या वनौषधीच्या माध्यमातून स्वंयरोजगार निर्माण करू शकतात. या संशोधनाव्दारे महिलाच्या स्वास्थ्यसंवर्धनात्मक दृष्टीकोनातून वनौषधीची विश्लेषणात्मक माहिती जाणून घ्यायची आहे. व या वनौषधीपासून कोणता स्वयंरोजगार करता येतो याची माहिती जाणून घ्यायची आहे. हि माहीती संकलीत करण्यासाठी गुणात्मक पध्दतीने अभ्यासून अन्वषेणात्मक आराखडयाचा उपयोग करून गडचिरोली जिल्ह्यातील धानोरा तालूक्यातील महिलाची निवड करण्यात आली. आदिवासी महिला या दुर्गम भागात राहतात. याच्या आरोग्यावर अनेक गोष्टी परिणाम करतात. यामुळे येथिल महिलाना अनेक आरोग्यविषयक समस्या उद्भवतात. या आरोग्यावर उपचार करण्यासाठी जंगलात मिळणा-या वनौषधीचा उपयोग जास्तीत जास्त करताना दिसतात. येथिल वनौषधी ग्लोबल होण्याच्या मार्गावर असल्यामुळे येथिल वनस्पतीला खूप मागणी आहे. या वनस्पतीची जाण येथिल महिलाना असल्यास त्यांना याच्यापासून रोजगार प्राप्त होऊ शकतो. या महिलामध्ये आवड असली तर स्वंताचा स्वयंरोजगार निर्माण करू शकतात. यामुळे त्याच्या आर्थिक व कौंटुबिक दर्जा उचावून आत्मसन्माने या महिला जीवन जगू शकतील.

**बीजसंज्ञा :-** आदिवासी महिला, स्वास्थ्यसंवर्धनात्मक, वनौषधी, स्वंयरोजार.

## प्रस्तावना :-

समाजाशिवाय व्यक्तिच्या जीवनाला कोणताही अर्थ नाही. कारण व्यक्ती समाजात जन्माला येते. समाजातच त्यांच्या जीवनाला परिपक्वता येते व शेवटी व्यक्तीचा अंतही समाजातच होतो. समाजात जीवन जगत असताना व्यक्तीला अनेक व्यक्तीशी सामाजिक सबंध प्रस्थापित करावे लागतात. समाजात व्यक्तीने जीवन कसे जगावे या संबधाचे निकष सामाजिक संस्था ठरवतात या निकषापैकी एक निकष आहे 'स्वास्थ्य' प्रत्येक समाजातील प्रत्येक व्यक्तीचे जीवन 'स्वास्थ्य सपन्न'असावे. सर्वच व्यक्तींना 'आरोग्य सपन्न' जीवन जगता यावे म्हणून समाजातील राज्यसंस्थेतर्फे प्रयत्न केले जातात. मानवी जीवनाच्या प्रांरभिक अवस्थेत

रोगाची निर्मिती व लागण दैवी कोपामुळे होते. असे मनुष्य मानीत होता आजही काही मागासवर्गीय आदिवासी जमातीत तसेच दूर वास्तव्य करणा-या ग्रमीण समाजातही माणसाला होणारे आजार हा दैवी प्रकोपाचा उद्रेक आहे असे मानले जात आहे व जात आहे. आदिवासी व ग्रमीण परिसरात रोंगावर उपचार करणे म्हणजे देवाची पूजा-अर्चना निसर्गशक्तीना आव्हान करणे. ज्याच्यांवर देव प्रसन्न आहे अशा धर्मगुरुंची किंवा भंगताची मदत घेत असत. आदिवासीमधील परंपरागत अंधश्रद्वामूळे रोग किंवा आजार झाल्यावर ते प्रथम त्यांच्या भगत, पुजारी याच्याकडें जातात व देवदेवतांना कौल लावून दैवी कोप समजून त्यांच्या सल्ल्याानुसार धार्मिक विधी,बळी देणे, इ. करतात. दुष्टशक्ती, भुतखेत, दैत इ. कडे जातात भगताकडून जादुटोना, काळी जादू या माध्यमातून रोगापासून मूक्ती मिळवण्याच्या प्रयत्न करतात. मनुष्य हा संशोधन प्रिय प्राणी आहे त्यामुळेच त्यांने निसर्गात आढळणा-या पाने, फुले, वृक्ष, वेली वृक्षाची मुळे व जंगलात सापडणा-या अन्य काही वस्तुचा शोध घेऊन त्यांतील औषधी गूणधर्माचा शोध घेउन त्यांचा वापर रोग्यांना तारण्यासाठी व रोगजंतुना मारण्यासाठी झाल्याचे दिसून येते. हजारो वर्षापासून वनौषधीचा उपयोग रोगपरिहार, वेदनामुक्ती, सौंदर्यवर्धन इत्यादीसाठी जगभर वापरल्या जाते या वनस्पतीचे निनिराळे भाग (जसे मुळ, खोड, पान, फुले, बिया, साल इ) व याच्यापासून बनवलेले काढे, रसायने, गोळया, लेप तेल, अर्क इत्यादी स्वरुपात उपयोगात आणतात. आयुर्वेद, यूनानी, होमिओपॅथी, ॲलोपॅथी, चिनी तिबेटी, निसर्गोपचार इ. सर्व औषधी वनस्पतीमध्ये वनौषधीचा उपयोग होतो.

जंगलात डोगरद-यात राहणारे आदिवासी लोक वनौषधीवर अवलंबून असायचे. एखादा आजार झाल्यास औषधी वनस्पतीचा वापर करुन आजारपणापासून मूक्त होत असतात. आजच्या काळतही आदिवासी लोक आजारावर उपचार करण्यासाठी वनौषधीचा उपचार करीत असतात. आदिवासी जमातीमध्ये आजही स्त्रींया' ह्या कष्ट करुन जीवन जगतांना दिसतात त्यांना अनेक प्रकारचे आजार असतात. पूर्विपार चालत आलेली उपचार पध्दती वापरुन आजार बरे केले जातात. या उपचार पध्दतीमध्ये वनात सापडणा-या अनेक वनस्पतीचा उपयोग केला जातो.

आदिवासी समाज हा द-याखो-यात जंगलात राहतो. आदिवासी स्त्रीं रोज जंगलमध्ये फिरत असते. यामुळे तेथील वनौषधीची परिपूर्ण माहिती असते. त्यामूळे त्यांचा उपयोग स्वास्थ्य संवर्धनासाठी करेल त्याचबरोबर या स्त्रींयाना स्वत:च उदयोग देखील उभारता येवू शकतो. ह्या स्त्रींया निसर्गातच किंवा स्वाभाविकपणे उद्योजक असतात. फक्त आवश्यकता असते ती त्याच्या

क्षमताची त्यांना जाण करुन देण्याची म्हणूनच विविध वनौषधाची माहिती दिली तर त्यांना स्वंयरोजगार करता येईल यामुळे त्यांच्या आत्मसन्मान व्दिगुणीत होईल. यामुळे त्यांच्या आर्थिक व कौंटुबिक दर्जा उंचावल्या जाईल.

**संशोधनाचे महत्व**-(Importance of Research)

भारतिय समाजाचे मुख्य वैशिष्टये ग्रमीण आणि शहरी समाज आहे. या दोन समाजापेक्षा वेगळा राहणरा समाज म्हणजे आदिवासी होय आदिवासी समाज हा भारतीय समाजातील दुर्बेल घटकापैकी एक आहे.

महीलाच्या विकासमध्ये आरोग्य महत्वाची भूमिका बजावताना दिसून येते. वनौषधी व्दारे सुदृढ आरोग्य महिलाना लाभावे हा उद्देश आहे. विकसीत देशाचे स्वप्न साकारायचे औचित्य साधायचे असेल तर स्त्रींयाच्या आरोग्यकडे लक्ष देणे गरजेचे झाले आहे. स्वास्थ्य चांगले राहिल्यास सर्व उद्भवणा-या समस्यांना ह्या स्त्रींया तोंड देवू शकेल रोज जंगलामध्ये फिरणा-या स्त्रींयाना वनौषधीची माहीती झाल्यास त्यांचा उपयोग करुन ह्या समस्या घालविता येथिल. केवळ वनौषधींची माहिति मिळावी हा उद्देश नसून आदिवासी भागातील पिछाडलेल्या महिलाना स्वंताच्या आरोग्याची, तसेच कुटुंबाच्या आरोग्याची माहिती मिळून वनौषधीवर सुदृढ आरोग्य लाभावे, मजुरी मिळत नाही म्हणून हतबल न होता स्वत:जवळ असलेल्या वनौषधीच्या माहितीच्या आधारे एखादा उद्योग सुरु करुन कुंटुबाला हातभार लागु शकेल या महिलाना प्रेरीत केल्यास ह्या स्त्रींया निश्चितच कुंटुबाच्या अर्थाजनामध्ये हातभार लावतील आणि याचा विकास घडवून आणणे सहज शक्य होईल.

महिलाच्या विकासासाठी वनौषधीच्या माध्यमातून स्वंयरोजगाराची संधी व त्यांची माहिती अत्यंत समरसतेने आणि प्रभावीपणे मांडून महिलाचा आत्मसन्मान व्दिगुणित करण्याचा यशस्वी प्रयत्न केला गेला पाहिजे त्यामुळे महिलाचे आरोग्य तर जपल्याच जाईल. महिलाच्या विकासाला नवी दिशा व वेग मिळण्यास चांगली मदत होईल आणि आदिवासी महिलांना स्वंयरोजगाराच्या माध्यमातून विकास साधता येईल. वनौषधीव्दारे त्यांच्या स्वांस्थ्यसंवर्धनाचा विचार केला जाईल तसेच त्यांच्याकडून घेतलेल्या माहितीची इतर महिलाना मदत मिळेल.

**प्रस्तुत संशोधनाचे उद्दिष्टे :**

१.गडचिरोली जिल्ह्याच्या वनातील वनौषधीबद्दल विस्तृत माहिती जाणून घेणे.

२.गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी महिलाच्या स्वास्थ्यसंर्वधनात्मक दृष्टीकोनातून वनौषधी यांचा संबध जाणून घेणे.

३.गडचिरोली जिल्ह्याच्या जंगलातील वनौषधी आणि स्वंयरोजगारविषयी माहिती जाणून घेणे.

**संशोधनाची गृहितकृत्ये :**

I J R S S I S, Issue (VIII), Vol. II, Jan 2023: 321-330
A Double-Blind Peer Reviewed Journal
e-ISSN 2347 – 517X
Original Article

संशोधन समस्येचे निर्धारण केल्यानंतर त्या समस्येच्या संदर्भात काही अनूमान किंवा संभाव्य उत्तरे काढली जातात त्यालाच गृहितकृत्ये असे म्हणतात. संशोधन करण्याकरिता आवश्यक असलेले गृहितकृत्ये निश्चित करण्यात आली आहे.

१. आदिवासी स्त्रींयाचे स्वास्थ्यसंवर्धन आणि वनौषधी यांचा संबध दिसून येत नाही.

२. गडचिरोलीच्या जंगलातील वनौषधीच्या माध्यमातून रोजगार प्राप्त होत आहे.

**अध्ययन क्षेत्र :** महाराष्ट्रातील गडचिरोली जिल्हा हा ईशान्य दिशेला असून आंध्रप्रदेश व छत्तीसगड राज्याच्या सिमेलगत आहे. हा जिल्हा नक्षलग्रस्त आहे. हा जिल्हा ७८ टक्के जंगलाने व्यापलेला आहे. या जंगलामध्ये नक्षल समर्थक लोक घनदाट जंगल असल्यामुळे आश्रय घेताना दिसतात.या जिल्ह्यात आदिवासी जमातीची सख्या जास्त आहे. हा जिल्हा डोंगरद-यानी व घनदाट जंगलाने व्याप्त असून अविकसीत समजला जातो. आदिवासी लोंकाना ‘वनवासी’ म्हणजेच वनात राहणारे असे संबोधले जाते. हे लोक आरोग्य जपण्यासाठी वनौषधीचा उपयोग करतात. ७८ टक्के वन असलेल्या गडचिरोली जिल्ह्यातील जंगलात औषधी गुण असलेल्या हजारो या वनस्पतीचा उपयोग येथिल स्त्रींयाना स्वास्थ्यसंवर्धनासाठी होतो का या वनौषधीपासून स्वंयरोजगार करता येतो का या समस्यासंबधी तथ्यासंबंधी संशोधन क्षेत्र गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी महिला पुरती मर्यादित राहिल.

**संशोधन पध्दती:**

प्रस्तुत विषयाच्या अंनुषगाने संशोधनासंबधीत माहिती संकलीत करीत असताना. यामध्ये आदिवासी महिलाच्या स्वास्थ्यसंबंधी उपयोगात येणा-या वनौषधी आणि वनौषधीच्या माध्यमातून स्वंयरोजगार कसा निर्माण करता येतो अशा विषया संबधीत शास्त्रीय पध्दतीनुसार अभ्यास करायचा आहे. हा संशोधनाचा प्रकार हा व्यावहारिक आहे. म्हणुन जास्तीत जास्त गुणात्मक काही अशी संख्यात्मक अशा भिन्न स्वरुपात अभ्यासला आहे.

**संशोधन आराखडा :**

प्रस्तुत विषय अभ्यासण्यासाठी अन्वषेणात्मक संशोधन आराखडयाचा उपयोग करण्यात आला आहे. कारण प्रस्तुत संशोधना चा विषय सामाजिक शास्त्रे विद्याशाखेतून संशोधित केला गेला आहे. संशोधन प्रश्नाच्या अनुषंगाने त्या समस्याच्या कारणाचा अभ्यास करावयाचा असल्यामुळे व त्या समस्याचे संशोधनाच्या माध्यमातून निदान करणे गरजेचे होते. आदिवासी महिलाचे स्वास्थ्य बद्दल माहिती जाणून घेणे व त्या स्वास्थ्यवर उपाय करण्यासाठी वनौषधीचा वापर कसा होतो म्हणुन या संशोधनासाठी समग्र आराखडयापैकी अन्वषेणात्मक संशोधन आराखडयाची मदत घेण्यात आली आहे.

**नमुना निवड:**

प्रस्तूत विषय अभ्यासासाठी गडचिरोली जिल्ह्यातील धानोरा तालुक्याची निवड केली आहे. धानोरा तालुक्याची एकुण गावाची संख्या २१२ आहे. या एककाचे अध्ययनासाठी साधा यादृच्छिीक नमुनाच्या पध्दतीतून कोटा पध्दतीचा उपयांग करुन ४० महिलाची निवड करण्यात आली आहे.

**तथ्य संकलन:**

संशोधन कार्य करण्यासाठी प्राथमिक तथ्याचा उपयोग केला जातो. या पध्दतीमध्ये मुलाखत, निरीक्षण, अनुसूचिचा वापर करण्यात आला. दुय्यम स्त्रोतच्या माध्यमातून लिखीत दस्ताऐवज, मासिके, दैनिक वृत्तपत्रे त्याच प्रमाणे संगणक

प्रणालीद्वार विविध संकेत स्थळाच्या माध्यमातून तथ्य संकलन केले जाणार आहे.

**गडचिरोली जिल्ह्यातील वनौषधी:**

भारतात औषधी वनस्पतीच्या सु. २००० जाती आढळतात त्या भिन्न अशा विस्तारलेल्या भौगोलिक क्षेत्रात पसरलेल्या आहेत. निरनिराळया वनस्पतीसाठी हवामान,जल,क्षेत्रही भिन्न भिन्न स्वरूपात पाहिजे. गडचिरोली जिल्ह्यातील घनदाट जंगलात अनेक वनौषधी उपलब्ध आहेत. ७८टक्के वन असलेल्या गडचिरोली जिल्ह्यातील वनविभागाने ३२ प्रकारची औषधी वनस्पती तयार केली आहे. जंगलात डोगरद-यात राहणारे आदिवासी लोक हे वनौषधीवर अंवलबून असतात. एखादा आजार झाल्यास औषधी वनस्पतीचा वापर करून आजारपणापासून मूक्त होत असतात आजही आदिवासीच्या जीवनात वनस्पतीचा वापर करण्यात येतो. वनस्पतीवर विश्वास ठेवून संकट निवारण व्हावे म्हणून त्यांचे सेवन करण्यात आले. ब-या वाईट अनूभवानंतर वनस्पतीच्या निरनिराळया उपयोगाचे ज्ञान त्याला झाले जादुटोण्याकरीता वापरवयाचा जालीम वनस्पतीबरोबरच अंगाचा दाह कमी करण्यासाठी उटणी म्हणून वापरावयाच्या वनस्पती शोधुन काढल्या वनस्पतीमध्ये ताकद वाढविण्याची क्षमता त्याचप्रमाणे रेग दूर करून आराम देणा-या औषधी वनस्पती आहेत. या वनस्पतीचा उपयोग येथिल वैदू औषधी म्हणून करतात. कोणत्या आजारावर कोणत्या वनस्पतीचे औषध द्यायचे येथिल वैद्य लोकाना माहित असते. औषधी गुण असलेल्या अश्याा अनेक वनस्पती आहेत. जसे बेहडा, पळसफूल, शरंफुखा, लाजाळू, ब्राम्ही गुळवेल, सहचर,बीजा, बाहवा, खैरसाल, रक्तरोहिणी, भूईनिंब, शतावरी,इसबगोल, रिगंणी, जेष्ठमध, आंबेहळद, पिठवण, सोनामुखी, कोरफड, हिरडा, बेल, बिब्बा, डिंकेमाली,टेटू सातविण,आवळा, वावडिंग,धावडा, अर्जूनबाकेरी, संर्पगधा, कीटक्षोद, ज्येष्ठमध, अश्वगंधा, बावची, कुळीथ, गुग्गुळ, बिज, ब्राम्ही, चंदन,इत्यादी वनस्पतीपासून पाने, फुले, साल, फळे, मूळे गोळा करुन अनेक

आजारावर औषध म्हणून उपयोग केला जातो.

**आदिवासी महिलाचे स्वास्थ्य व वनौषधी:**

शारीरिक, मानसिक, सामाजिक, दृष्टीने व्यवस्थित आणि रोगमूक्त असण्याची अवस्था म्हणजे आरोग्य होय. पोषण, आहार, व्यायाम, स्वच्छता, राहणीमान,इतराशी व्यक्तीगत संबंध या गोष्टी आरोग्यवर परिणाम करतात. आदिवासी महिलाच्या आरोग्यावर अनेक गोष्टी परिणाम करतात जसे त्यांची आर्थिक परिस्थिती, अज्ञान, अंधश्रध्दा, धार्मिक रिती, आधुनिकतेचा अभाव, अस्वच्छता, अपु-या वैद्यकिय सेवाचा अभाव इत्यादि गोष्टीमूळे त्याना अनेक आरोग्य विषयक समस्याा उद्‌भवतात, विविध साथीच्या रोगाचे प्रमाण इतर समाजाच्या तुलनेने आदिवासीमध्ये अनेक दिसून येतात. आदिवासी महिलामध्ये पुढीलप्रमाणे आजार दिसून येतात कुपोषण, दमा, ॲनिमिया, जंतुदोष, सूज, पाळीचे विकार, थॉयराईड, एड्स, कर्करोग, मुळव्याध, मधूमेह, डोकेदुखी, आव येणे, काविळ, पित्तनाशक, जखम, त्वचा रोग, संधिवात इत्यादि आजार दिसून येतात. अश्या अनेक आजारावर वनौषधीचा उपयोग करताना दिसतात कारण कोणत्या वनस्पती कोणत्या आजारावर घ्यायची हि कला त्यांना अवगत असते तर कधी कधी त्या स्थानिक भंगताकडे जाऊन उपचार घेत असतात. पुढील काही वनौषधी आहेत त्याच्या कोणत्या आजारावर उपचार करता येतो.


| अ. क्र. | वनौषधी | उपचार पद्धती. |
|---|---|---|
| 1 | मोह | फुलात एक प्रकारची साखर असते त्या पासून मद्य तयार करतात. त्याची फुले रक्तभिसरणावर उपयोगी असते. |
| 2 | बेहडा | याचे फळ पोटदुखीवर उपयुक्त. याचे चूर्ण करून अतिसार व आव यात वापरतात. |
| 3 | रानतुळस | या झाडापासून तेल काढतात. हे तेल संवेदनाहारक, कमी विषारी आणि दाहयुक्त असते. |
| 4 | एरंड | या वनस्पतीचा कावीळ या रोगावर उपयोग होतो. या झाडाची पाने दुधातुन रोज सकाळी दिल्यास हा रोग बरा होतो. |
| 5 | उबर, जाभूळ, मधळ | या वनस्पतीचा हगवण या आजारावर उपयोग केला जातो.वरील झाडाचे साल काढून आणून कुटणे व एक ग्लास पाणी घेवून त्यात चुर्ण टाकून पिण्यास देणे. |
| 6 | मधळ | या वनस्पतीचा उपयोग दुध वाढविण्यासाठी केला जातो. या झाडाचा पाला पाण्यात पिळून पाणी पिण्यास दिल्याने दूध वाढते. |
| 7 | सदाफुली | या वनस्पतीच्या मुळात अनेक अल्कलॉइडे नावाचे गुणधर्म असून रक्तदाब कमी करते. पानाचा रस काढून गांधील माशीच्या दंशावर लावतात यांचा सफेद चिक अतिस्त्रावर लावतात मधुमेहावर ही यांचा उपयोग होतो. |
| 8 | बेल | या फळाचा गर आतडयास शक्ती देतो यांचे मूळ ज्वर व अतिसारात उपयोगी आहे |
| 9 | जटासासी | यांचे मूळ मेंदू व तंत्रिका तंतुच्या विकारावर तसेच पोटदुखी व त्वचारेग यासाठी उपयुक्त आहे. |
| 10 | रानसेटोला | या वनस्पतीचा उपयोग पोटात गोळा उठल्या आजारावर केला जातो. या झाडाचा कंद काढून ज्या ठिकाणी गोळा उठतो त्या ठिकाणी शेक द्यावे. |

I J R S S I S, Issue (VIII), Vol. II, Jan 2023: 321-330
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 517X
Original Article

अशाप्रकारे विविध वनौषधी आहेत त्याचा उपयोग विविध आजारावर होतो. म्हणुनच निलीमा जोरवर यानी रानभाज्या–निसर्गाचा अमूल्य ठेवा यात त्यांनी म्हटल कि 'पावसाळयात पोटाचे विकार कमी करण्यासाठी 'टाकळा'किंवा 'तरोटा' ही वनस्पती अवश्य खातात. कामुनी नावाची वनस्पती कावीळ झाल्यास खातात'.

वनौषधीचा वापर स्वास्थ्यसाठी किती प्रमाणात करतात यांचा अभ्यास करण्यासाठी ४० महिलाची माहिती संकलीत केली असता पुढील आकडेवारी प्राप्त झाली.

| विवरण | प्रत्येक आजारावर | काही काहीच आजारावर | कोणत्याच आजारावर नाही | एकुण |
|---|---|---|---|---|
| संख्या | ३० | ७ | ३ | ४० |
| प्र.श. प्रमाण | ७५% | १७.५% | ७.५% | १०० |




वरील सारणीवरून असे लक्षात येते ७५% महिला आजारावर वनौषधीचा उपयोग करताना दिसतात. १७.५% महिला काहि काहिच आजारावर वनौषधीचा वापर करतात. फक्त ७.५% लोक कोणत्याच वनौषधीचा उपयोग करताना दिसत नाही. सर्वे करतानी असे आढळून आले आदिवासी महिलाच्या जिवनात वनौषधीला किती महत्व आहे.

**वनौषधी आणि स्वंयरोजगार:-**

पृथ्वीतलावरील प्रत्येक वनस्पतीत काही ना काही तरी उपयुक्त गुणधर्म असतात. बरे वाईट गुणधर्म जाणून घेउन त्याचा योग्य प्रकारे उपयोग करणे महत्वाचे आहे. साधारणता आयुर्वेदिक औषध अनेक वनस्पतीची मिळून बनलेली असतात. औषधामधील प्रत्येक वनस्पती हि महत्वाची असते केवळ नावाने तर वनस्पती वैज्ञानिक दृष्टीने ती पारखून घेउन ठराविक प्रमाणात तिची मात्रा घेतल्यास ती रूग्णास आराम देउ शकतो. गडचिरोली जिल्ह्याच्या जंगलातील दुर्लक्षित वनौषधी ग्लोबल होण्याच्या मार्गावर आली आहे ३२ प्रकारची औषधी वनविभागाने तयार केली आहे. यामुळे स्थनिक लोकाना रोजगार मिळू शकतो. यामुळे जंगलाचे व औषधी वनस्पतीचे संवर्धन देखील होउ शकतो. जंगलामध्ये हजारो गुण असलेल्या हजारो वनस्पती व झाडे आहेत या वनस्पतीची माहीती तेथील फक्त वैदू औषधी म्हणून उपयोग करतात कोणत्या आजारावर कोणती औषध दिली ते सर्वसामान्य लोकाना सांगत नाही. या सर्व औषधाची माहिती सर्वसामन्य लोकाना व्हावी म्हणून वनविभागाने २८० वैदूची सभा घेऊन कोणत्या रोगावर कोणत्या वनस्पतीचा

उपयोग करतात हि माहिती जाणुन घेतली. औषधी गुण असलेल्या बेहडा, पळसफुल, शरफुखा, लाजाळू, ब्राम्ही, गुळवेल, सहचर, बीजा, बाहवा, खैरसाल रक्तरोहिणी, भूईनिब, आदि सुमारे १०० प्रकारच्या झाडाची आवश्यकतेनुसार पाने, साल, फळे, मुळे ,फुले गोळा केली यापासून चूर्ण तयार करून ते चूर्ण जिल्ह्यातील नोंदनीकृत वैदूकडे विकण्यासाठी उपलब्ध केले जाणार आहे. ही वनौषधी देशभरात पाहेचविण्याचा मानस गडचिरोलीच्या उपवनसंरक्षक लक्ष्मी अण्णा बत्तुला यानी व्यक्त केला आहे. त्या म्हणतात कि वनोपज नागरीकाकडून एका विशिष्ट दराने खरेदि केले जाणार असल्याने यातून स्थनिक लोकाना रोजगार प्राप्त होऊ शकतो. या द्वारे स्थानिक लोक स्वंयरोजगार सुध्दा करू शकतात .येथील महिला जंगलातून बोर, मोह, हिरडा, तेदुपत्ता, लाजाळू, आवळा, ब्राम्ही, टोळ, टेंबरं, येरोण्या, इत्यादी वस्तू गोळा करून विकतात यामुळे त्याना आर्थिक मिळकत होते. आयुर्वेदीय पध्दतीन काढा, मलमे, चूर्ण,भस्मे, गुटिका, इत्यादिचे यांत्रीक उत्पादन करण्यासठी कच्च्या मालाची आवश्यकता असते. या कच्च्या मालाचा पुरवठा स्थानिक आदिवासी लोक पुरवतात यापासून येथिल लोकाना रोजगार मिळतो. भारतात वन विभागार्फे हिरडा, बेहडा, आवळा, वावडिंग, धावडा, अर्जुन, बोकरी,इ वनस्पती जमा केल्या जातात. डिकेंमाली, टेटु, पळस ,सातविण, बिब्बा, बेल, शिवण, वायवर्णा, सांबर, हिरडा, बेहडा, जीतसई, जेंष्ठमध, आंबेहळद, पिठवण, सोनामुखी, कोरफड इ. झाडाचे संर्वधन केल्या जात आहे, स्थानिक महिलाना या झाडाची लागवड करून व त्यांचे संवर्धन करून याची विक्री केली तर येथिल स्थनिक महिलाना चांगला रोजगार प्राप्त होऊ शकतो

वनात मिळणा-या पदार्थापासून अनेक खाद्यपदार्थ तयार करतात. जसे कंरवदापासून लोणचे, मोहापासून सरबत, जॅम, लाडू, कवठापासून सरबत, चटनी ,अंबाडी पासून सरबत तयार करून विकतात हे पदार्थ कसे तयार करायचे याचे व्यावसायिक दृष्टीने येथिल महिलाना प्रशिक्षण दिले तर त्या स्वंता या माध्यमातून स्वंयरोजगार करू शकतील. वनौषधीवर प्रक्रिया करण्यासाठी गडचिरोली येथे स्वतंत्र गोंडवाना हर्बस ची स्थांपना करण्यात आली आहे, या हर्बसमध्ये मोहापासून जॅम, सरबत तयार करतात, बीज झाडापासून बीज ग्लास तयार करतात. हा ग्लाास मधुमेही आजारावर उपयुक्त आहे. मेंहदी, आवळा, रिठे याच्यापासून पावडर तयार करतात या साठी लागणारा कच्चा माल आदिवासी लोकाकडून खरेदी करतात. यामुळे येथील लोकाना रोजगार प्राप्त होतो. जंगलातून नागरिकाना रोजगार मिळण्यासाठी शासनाने स्थानिक लोकाना वनोपज गोळा करण्याचे अधिकार पाच

वर्षापासून दिले आहे. गोंडवाना हर्बस मध्ये ५८६ क्विंटल वनौषधी गोळा झाली आहे. वनौषधीपासून येथिल महिलाना किती रोजगार प्राप्त होतो याचा अभ्यास करण्यासाठी ४० महिलाचा सर्वे केला असता पुढील प्रमाणे आकडेवारी प्राप्त झाली.

| विवरण | स्वंयरोजगार करणारे | रोजगार करणारे | एकुण |
|---|---|---|---|
| संख्या | १५ | २५ | ४० |
| प्र.संख्या | ३७.५% | ६२.५% | १०० |

वरील सारणीवरून असे लक्षात येते वनौषधीपासून स्वंयरोजगार करणारे ३७.५% महिला आहेत. तर रोजगार करणा-या महिला ६२.५% महिला आहेत. सारणीवरून असे लक्षात येते कि रोजगार करण्या-या महिलाचे प्रमाण जास्त आहे. व स्वंयरोजगार करणा-या महिलाचे प्रमाण कमी आहे. कारण स्वंयरोजगार करण्यासाठी पैसा, वेळ, आवड, कौशल्य, ज्ञान या गोष्टीची आवश्यकता असते. त्याचप्रमाणे स्वंयरोजगार करण्यासाठी काही अटी व नियमाची पूर्तता करावी लागते. आदिवासी महिलामध्ये या सर्व गोष्टीची कमतरता असल्यामूळे स्वयंरोजगार करण्याचे प्रमाण कमी दिसते.

**निष्कर्श:**

१.गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी महिलाना गरिबीमूळे. अज्ञानामुळे, अस्वच्छतेमुळे त्यांना अनेक आरोग्याविषयक संमस्याना तोंड दयावे लागते.

२.या जिल्ह्यात अनेक वनौषधी मिळत असल्यामुळे येथिल महिला आरोग्यावर उपचार करण्यासाठी वनौषधीचा उपयोग करतात.

३.गडचिरोली जिल्ह्यातील वनामध्ये ३२ प्रकारची औषधी वनविभागाने तयार केली असून यामूळे येथिल स्थानिक महिलाना रोजगार मिळतो.

४.औषधीयुक्त ज्या वनस्पती आहे. त्यांची लागवड करून संवर्धन करणे गरजेचे आहे.

५.वनौषधीपासून विविध प्रकारचे स्वंयरोजगार करता येतो. औषधीसाठी कच्च्या मालाची आवश्यकता असते हि वनातूनच मिळत असल्याकारणने स्थानिक लोकाना रोजगार प्राप्त होऊ शकतो.

६.वनौषधीपासून रोजगार मिळत असल्याने येथिल महिलाना आर्थिक मिळकत होऊन त्यांच्या कुंटूबाचे राहणीमान सुधारून त्यांचा आत्मसन्मान द्वीगुणीत होईल.

**सर्व साधारण सूचना:**

१.येथिल आदिवासी महिलाना वनौषधीबद्दल प्रशिक्षण देऊन त्यांनी तयार केलेल्या वनौषधीची खरेदी सरकारकडून व्हावी.

२.जंगलात मिळणा-या पदार्थापासून अनेक खाद्यपदार्थ तयार होतात ते पदार्थ विक्रिच्या दृष्टीने ते कसे तयार करायचे, जास्त दिवस कसे टिकतील, पॅकबद कसे करायचे या सर्व

गोष्टीची माहिती येथील महिंलाना दिली तर त्या स्वंताचा स्वंयरोजगार चांगला ऊभारू शकतील.

३.मध व कोरफळ यांची खरेदी करण्यासाठी रामदेवबाबानी करार केला आहे. यां उत्पादनावर जास्त भर देणे गरजेचे आहे.

४.गोंडवाना हर्बस मध्ये औषधी बनविण्यासाठी कच्च्या मालाची आवश्यकता असते. हा कच्चा माल स्थनिक आदिवासी महिलाकडून खरेदि करून त्यांना योग्य भाव देण्यात यावा.

**संदर्भ :-**

डॉ.प्रदिप आगलावे– आदिवासी समाजाचे समाजशास्त्र श्री. साईनाथ प्रकाशन नागपूर

आदिवासी विकिपिडीया - **website**

डॉ.प्रदिप आगलावे (२०००) संशोधन पध्दती शास्त्रे व तंत्रे ,विद्या प्रकाशन,नागपूर

दामू कमा कूवरा –वनौषधी– विकिपिडीया https://mr.m.wikipedia.org/wiki/

वनस्पती, औषधी – मराठी विश्वकोष.

https;//www.lokmat.com/Maharashtra/global-herbal-medicine-gadchiroli.September 9.2014

https://www.lokmat.com/Maharashtra586-quintals-herbal-compounds-collected gadchiroli-forest

महाराष्ट्र टाइम्स /Feb.22 -2018 https:///Maharashtra.com/Nagpur.